# तीन दिवसीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रम

◆ **पारशिवनी, १९ जानेवारी**

कोंडासावळी येथील भिवसन पेंच फार्मर प्रोड्युसर कंपनी अंतर्गत तीन दिवशीय शेतकरी प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षण कार्यक्रमाचे नियोजन नागपुरच्या कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) यांनी संयुक्तरित्या केले होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्रीय कापूस संशोधन संस्थेचे संचालक डॉ. व्ही. एन. वाघमारे होते. दरम्यान, या प्रशिक्षण कार्यक्रमास केंद्र पुरस्कृत परंपरागत कृषी विकास योजने अंतर्गत सेंद्रिय शेती करणारे ४० शेतकरी उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून मार्गदर्शक हेमंत पिकलमुंडे यांनी दहा ड्रम थेरी या विषयावर मार्गदर्शन केले. एम.एन.नासरे यांनी हायटेक जीवामृत सिस्टिम, सेंद्रिय मालाचे प्रमाणिकरण आणि सेंद्रिय पिक मालाची विक्री व्यवस्था या विषयावर भर दिला. तर कार्यक्रमात वैज्ञानिक व विषयतज्ज्ञ डॉ. उल्हास गलकाटे (पशुविज्ञान), डॉ. मयूरकुमार मेश्राम (कृषी विज्ञान) यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थींना सेंद्रीय आणि नैसर्गिक शेतीचे मार्गदर्शन केले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

**Tarun Bharat 20 January, 2026**